पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ५५

**सभावृत्तांत**

दिनांक - ०९.०४.२०१३ वेळ - दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ०९/०४/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जगताप नवनाथ दत्तू - सभापती
२) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
३) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा.छाया जगन्नाथ साबळे
५) मा.जगदीश शेटटी
६) मा.भालेकर अरुणा दिलीप
७) मा.वाघेरे सुनिता राजेश
८) मा.महेशदादा किसन लांडगे
९) मा.बारणे माया संतोष
१०) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
११) मा.लोंढे गणेश नारायण
१२) मा.कदम सदगुरु महादेव
१३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१४) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.आयुक्त – डॉ.श्रीकर परदेशी, मा.झुरे- सह आयुक्त, मा.मुंढे, मा.कारचे, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे,मा.फुंदे,– सहाय्यक आयुक्त, मा.घाडगे – मुख्य लेखापरीक्षक, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहरअभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण – सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ.गायकवाड – प्र.आरोग्य वैद्याकेय अधिकारी, मा.पवन साळवे - अति.वै.अधिकारी, मा.भदाणे- उपसंचालक नगररचना, मा.दुधेकर, मा.ढगे, मा.निकम, मा.सवणे, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव,मा.कुदळे, मा.कपिले, मा.थोरात, मा.चिंचवडे, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत,मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेटटी, मा.सय्यद - कार्यकारी अभियंता, मा.भोसले –प्रशा-अधिकारी शिक्षण मंडळ, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मा.चव्हाण – आरोग्य कार्यकारी, मा.पवार –

प्र.कायदा सल्लागार मा.पाटील-प्रशा. अधिकारी,मा.पाटील- प्राचार्य आयटीआय, मारेवाडी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>**

**<u>विषय क्र.३६</u>** - आरक्षण क्रमांक ४१५ वॉर्ड क्र.३४ आदिनाथनगर, भोसरी उद्यान अजिंक्य मंडळास देखभालीसाठी ३ वर्षा करितादेणे.मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

**<u>विषय क्र.३७</u>** - मनपा उद्याने ३ वर्षाकरिता देखभाल दुरुस्तीस देणे. (क्र.१ ते ४) मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

**<u>विषय क्र.३८</u>**- से.नं.२३ वाहतुकनगरी पार्किंगसाठी वाहनतळ उपलब्ध करुन देणे. (दरमहा र.रु.४०,०००/-) मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

**<u>विषय क्र.३९</u>** - प्र.क्र. १७ संत तुकाराम उद्यान, स्वामी समर्थ बेरोजगार सेवा सह संस्थेस ३ वर्षासाठी देणे. मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

**<u>विषय क्र.४०</u>** - भोसरी नाशिक हायवे शितलबाग, फुटओव्हर ब्रीज बांधणे

अ) दिनांक ०१/०४/२०१३ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले .

ब) दिनांक ०२/०४/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - ५४ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ३२३३ विषय क्रमांक – १

दिनांक – ९/४/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/८३/१३ दि.१९/३/२०१३.

विषय - प्रभाग क्र.८९ येथील ब्रम्हवृंद कॉलनी व नवीन बाणेर पुलाकडे जाणा-या रस्त्यास सी.डी.वर्क बांधणेबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२३४ विषय क्रमांक – २

दिनांक – ९/४/२०१३ विभाग– स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा. चंद्रकांत वाळके अनुमोदक–मा.विनया तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/ले-१/कावि/७५/१३ दि.२१/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२१/२४/२०१२-१३ मधील अ.क्र.२० अन्वये, औंध रावेत रस्ता सुधारणीकरण अंतर्गत (भाग-१) बाधित रस्ते असलेले संरक्षण विभागाचे निवासी गाळे बांधणेकामी मे.आर.टी.सबरवाल (नि.र.रू.६७,८७,९५०/- [र.रू. सदुसष्ट लाख सत्याऐंशी हजार नऊशे पन्नास] पेक्षा ५.५० **%** जास्त) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.७१,६१,२८७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे या अटीसह निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२३५ | विषय क्रमांक – ३

दिनांक – ९/४/२०१३ | विभाग – पाणीपुरवठा ब प्रभाग

सुचक – मा.जगदीश शेटटी | अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/बप्र/१५/१०८/२०१३ दि.२५/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

जे.एन.एन.यु.आर.एम.फेज-२ अंतर्गत चिंचवड बिजलीनगर येथील स.नं.१९५ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेत २५.०० ल.लि क्षमतेच्या पाण्याच्या उंच टाकी बांधणेचे काम तांत्रिदृष्ट्या पुर्ण केले असल्याने बिलांच्या अदायगीच्यादृष्टीने वाढीव खर्च र.रू.९,६३,४६२/- (र.रू.नऊ लाख त्रेसष्ट हजार चारशे बासष्ट) प्रस्तावात नमुद प्रमाणे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२३६ | विषय क्रमांक – ४

दिनांक – ९/४/२०१३ | विभाग – स्थापत्य

सुचक – मा.महेशदादा लांडगे | अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/७८/१३ दि.३०/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१९/२०१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, प्र.क्र.३० नेहरूनगर मधील स्मशानभुमीत विद्युत दाहिनीसाठी स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.आर टी सबरवाल (नि.र.रू.४६,६१,४०७/- [र.रू.शेहेचाळीस लाख एकसष्ट हजार चारशे सात] पेक्षा २.८१ **%** जास्त) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.४७,९२,३९३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील

या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२३७ विषय क्रमांक – ५
दिनांक – ९/४/२०१३ विभाग स्थापत्य
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/९६/१३ दि.३०/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अ.क्र.२९ अन्वये, वॉर्ड क्र.९१ सांगवी संगमनगर ते मुळानगर पर्यंतच्या विकास आराखड्यातील रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी मे.अजवानी इंफ्रा.प्रा.लि. (नि.र.रू.३४,३०,४३९/- [र.रू.चौतीस लाख तीस हजार चारशे एकोणचाळीस] पेक्षा ५.५५ **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३४,०२,०५२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२३८ विषय क्रमांक – ६
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/८५/१३ दि.३०/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.अमुख्यालय/**HO**/१४/ २०१२-१३ मधील अ.क्र.१६ अन्वये, प्रभाग क्र.३ चिखली औद्योगिक भागातील रस्ते विकसीत करणेकामी मे.क्लिन्सी कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. पुणे (नि.र.रू.१,८६,७४,१३६/- [र.रू.एक कोटी शहाऐंशी लाख चौ-याहत्तर हजार एकशे छत्तीस] पेक्षा सुधारीत दर ३.०० **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,९०,१९,६०८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२३९ विषय क्रमांक – ७
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – विद्युत
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक–मा.विनया तापकीर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/नि/५/कावि/२७०/२०१३ दि.३०/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१५/२०१२-१३ मधील अ.क्र.२ अन्वये, वाकड उपविभागातील नव्याने होणा-या रस्त्यावर दिवाबत्ती व्यवस्था करणेकामी मे.आर.एन.एंटरप्रायझेस (नि.र.रू. ५३,३२,९४९/- [र.रू.त्रेपन्न लाख बत्तीस हजार नऊशे एकोणपन्नास] पेक्षा ३०.२० **%** कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२४० विषय क्रमांक – ८
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – विद्युत भुगयो
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:-मा.कार्यकारी अभियंता(वि) यांचे जा.क्र.वि/भुगयो/तां/७६/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा.कार्यकारी अभियंता(वि) यांनी शिफारस केलेप्रमाणे

च-होली मैलाशुध्दीकरण केंद्राकरीता एक्सप्रेस फिडरव्दारे वीजपुरवठा घेणेकरीताचे कामापोटी म.रा.वि.वि.कं.यांना दि.१२/१०/१२ रोजी वीजपर्यवेक्षण शुल्क र.रू.१६,२४,६१५/- अदा केले असून अधिकचे (**Additional**) उपअभियंता (वि), भु.ग.यो.यांनी अदा केलेले वीजपर्यवेक्षण शुल्क र.रू.१३,३५०/- (र.रू.तेरा हजार तीनशे पन्नास) दि.१३/१२/१२ रोजी रोख अदा करणेत आलेने सदर रक्कम उपअभियंता यांना परतावा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२४१ विषय क्रमांक – ९
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – मुख्य लेखापरिक्षण
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/२६७/२०१३ दि.२८/३/२०१३.

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२४२ विषय क्रमांक – १०

दिनांक – ९/४/२०१३ विभाग – औ.प्र.संस्था,मोरवाडी

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.औप्रसं/१/कावि/३१०/२०१३ दि.३०/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन-

१ एप्रिल २०१३ पासून महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लि.मी. यांनी **MS/CIT** संगणक प्रशिक्षण फी बाबत प्रस्तावात नमुद प्रमाणे निश्चित केलेले सुधारित धोरण स्विकारून त्याप्रमाणे कार्यवाही करणेस तसेच यापुढे लाभार्थी संख्येनुसार महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लि.मी. यांना प्रशिक्षण फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने गरीब विद्यार्थ्यांकरिता MS-CIT संगणक प्रशिक्षण कोर्सचे केंद्र औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आय.टी.आय.) मारेवाडी, पिंपरी ऐवजी गरिब विद्यार्थ्यांची संख्या खराळवाडी गांधीनगर परिसरात मोठया प्रमाणात असल्याने दोन्ही प्रभागाच्या मध्यभागी खराळवाडी गांधीनगर परिसरात MS- CIT संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२४३ विषय क्रमांक – ११

दिनांक – ९/४/२०१३ विभाग – औ.प्र.संस्था,मोरवाडी

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.औप्रसं/१/कावि/३०५/२०१३ दि.३०/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी येथे निदेशक पदावर तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर नेमणूक देणेकामी प्रस्तावात नमुद (अनु.क्र.१ ते ९) कर्मचा-यांना मा.उच्च न्यायालय यांच्या आदेशास अधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दि.१७/५/१३ रोजी एक दिवस सेवाखंड देवून दि.१८/५/१३ ते दि.१७/११/१३ पर्यंत सहा महिने कालावधीकरिता र.रू.८,०००/- एकत्रित मानधनावर हंगामी नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२४४ विषय क्रमांक – १२

दिनांक – ९/४/२०१३ विभाग – आरोग्य मुख्य कार्या.

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमुका/३/कावि/२०७/२०१३ दि.२६/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या आरोग्य विभागामार्फत घनकचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार **JNNURM** प्रकल्पा अंतर्गत अ व ड प्रभाग कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा मनपाच्या वाहनामार्फत गोळा करून टाकणेकामी नि.नो.क्र.४/१२-१३ देशपातळीवर प्रसिध्द करून कामाचे दर मागविणेत आलेले असून सदरची निविदा मे.महाराष्ट्र टाईम्स व टाईम्स ऑफ इंडिया यांचे देशपातळीवरील प्रसिध्द कामाची र.रू.१,८९,५५२/- (र.रू.एक लाख एकोणनव्वद हजार पाचशे बावन्न) तातडीने खर्च करणेत आलेली असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२४५ विषय क्रमांक – १३
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – विद्युत-भुगयो
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भः-मा.कार्यकारी अभियंता(वि) यांचे जा.क्र.वि/भुगयो/तां/७५/२०१३ दि.२५/३/२०१३.

मा.कार्यकारी अभियंता(वि) यांनी शिफारस केलेप्रमाणे

चिखली मै.शु.कें. येथील उच्चदाब उपस्कर वाहिनी बदलून भूमिगत केबल टाकणे या कामापोटी म.रा.वि.वि.कं.यांना उपअभियंता (वि), भु.ग.यो.यांनी अदा केलेले वीजपर्यवेक्षण शुल्क र.रू.१३,९१०/- अधिक प्रोसेसिंग फी १,०००/- असे एकूण र.रू.१४,९१०/- (र.रू. चौदा हजार नऊशे दहा) अदा करणेत आलेने सदर रक्कम उपअभियंता यांना परतावा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२४६ विषय क्रमांक – १४
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – विद्युत-भुगयो
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक –मा.जगदीश शेटटी
संदर्भः-मा.कार्यकारी अभियंता(वि) यांचे जा.क्र.वि/भुगयो/तां/७४/२०१३ दि.२५/३/२०१३.

मा.कार्यकारी अभियंता(वि) यांनी शिफारस केलेप्रमाणे

कासारवाडी मै.शु.कें. येथील उच्चदाब उपस्कर वाहिनी बदलून भूमिगत केबल टाकणे या कामापोटी म.रा.वि.वि.कं.यांना उपअभियंता (वि), भु.ग.यो.यांनी अदा केलेले वीजपर्यवेक्षण शुल्क र.रू.१४,७२०/- अधिक प्रोसेसिंग फी १,०००/- असे एकूण र.रू. १५,७२०/- (र.रू.पंधरा हजार सातशे वीस) अदा करणेत आलेने सदर रक्कम उपअभियंता यांना परतावा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२४७ विषय क्रमांक – १५

दिनांक – ९/४/२०१३ विभाग – अ प्रभाग

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक–मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अप्र/नि/२/कावि/४३८/२०१३ दि.१/४/२०१३.

विषय - नि.नो.क्र.५/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अ प्रभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील प्रभाग क्र.१४ व १७ कुंडीविरहीत वॉर्ड योजनेअंतर्गत घरोघरचा कचरा अलगीकरण करून गोळा करणे व वॉर्डातील कचरा उचलणे व विल्हेवाट लावणे कामी वाहने भाड्याने घेणेबाबत.

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२४८ विषय क्रमांक – १६

दिनांक – ९/४/२०१३ विभाग – नगरसचिव

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:-मा.प्रभारी नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/४२१/२०१३ दि.२८/३/२०१३.

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२४९ विषय क्रमांक – १७

दिनांक – ९/४/२०१३ विभाग – कायदा विभाग

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक –मा.अरुणा भालेकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कास/६/कावि/३१४/२०१३ दि.१/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ८८, ह (दोन) च्या तरतुदीनुसार मोटार वाहन अपघात दावा क्रमांक ७८०/११ मध्ये व्याजासह नुकसान भरपाई र.रू.२,४४,४४७/- आणि दावा क्रमांक ७८१/११ मध्ये व्याजासह नुकसान भरपाई र.रू. ५,५४,००६/- महापालिका निधीतून अदा करणे आवश्यक असून सदर नुकसान भरपाई देणेकामी मे.न्यायाधिकरणाने दाव्याचे तारखेपासून प्रतिवर्षी ६ **%** दराने व्याज देणेचा निर्णय दिल्याने रक्कम लवकरात लवकर अदा करणे आवश्यक असल्याने सदरची नुकसान भरपाई अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२५० विषय क्रमांक – १८
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/७/कावि/१५४/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाचे आरोग्य विभागासाठी फर्नोझोन (सोडीयम सॉल्ट) व निमटेक्स हर्बल लार्व्हीसाईड खरेदीकामी ई.नि.सु.क्र.२६/१३-१२/१३ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.डॉल्फिन सेल्स कॉर्पोरेशन कल्याण यांचे उक्त दोन्ही औषधांचे एकूण दर र.रू.७,०९,५००/- स्विकृत करून व करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२५१ विषय क्रमांक – १९
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – वैद्यकिय मुख्य कार्या.
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/२८७/२०१३ दि.२५/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

डॉ.दिपक गंगाधर पखाले, डॉ.प्रमोद आनंदराव पाथरे व डॉ.शशिकांत दिनेश सोनावणे (सी.एम.ओ., वाय.सी.एम.एच.) या रजा राखीव वैद्यकीय अधिकारी यांना दि.४/२/१३ पासून मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२५२ विषय क्रमांक – २०
दिनांक – ९/४/२०१३ विभाग–जनता संपर्क व स्वागत कक्ष
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जस/२/कावि/२१०/२०१३ दि.२/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

दि.११/४/१३ ते दि.१४/४/१३ या कालावधीत पिंपरी येथे प्रस्तावात नमुद प्रमाणे महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव थेट पध्दतीने आयोजनाकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

(अपेक्षित खर्च र.रू.१५,२४,५००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२५३ विषय क्रमांक – २१
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – भूमि आणि जिंदगी
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजिं/४/कावि/३६६/२०१३ दि.१/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

डॉ.श्री.उदय टेकाळे, सहाय्यक आयुक्त, प्रशासन विभाग यांना मनपा तर्फे निवासस्थानाची व्यवस्था करणे आवश्यक असलेने सौ.सुचेता संजय इनामदार यांची सदनिका बी-१४, कोहिनुर क्लासिक मार्वेल, निगडी प्राधिकरण, पुणे-४४. येथील क्षेत्र ८४९ चौ.फुटाची सदनिका मा.उपसंचालक, नगररचना विभाग यांनी निश्चित केलेले मासिक भाडेदर र.रू.१५/- प्रति चौ.फुट (मनपा/शासन करांव्यतिरिक्त) प्रमाणे प्रतिमहा मासिक भाडे र.रू.१२,७३५/- वापर दि.१/४/१३ पासून मनपा सेवेत प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत घरमालक यांना अदा करणेस व करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२५४ विषय क्रमांक – २२
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – क्रीडा
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.क्रीडा/अस्था-२/कावि/३१३/२०१३ दि.३/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मे.औद्योगिक न्यायालयाचे जैसे थे चे आदेश असल्याने न्यायालयीन दावा दाखल असलेल्या ७ जीवरक्षक दि.१/८/२००५ पासून आजतागायत तलावावर काम करीत आहे. तसेच दि.२८/२/१३ अखेर पर्यंत चे खर्चास मा.स्थायी समितीची

मान्यता घेतली आहे. त्यापुढील ६ महिने कालावधीचे म्हणजेच दि.१/३/१३ ते ३१/८/१३ अखेर कालावधी करीता र.रू.७,०००/- प्रतिमहा प्रती जीवरक्षक प्रमाणे मानधन अदा करावे लागणार असल्याने मानधन अदायगी चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२५५ विषय क्रमांक – २३
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – वैद्यकिय, मुख्य कार्या.
सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/२९२/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

वायसीएम तसेच इतर रूग्णालय व दवाखाने या ठिकाणी कार्यरत दंतशल्य चिकित्सक यांना शैक्षणिक अर्हता, अनुभव व कामकाजाचे स्वरूप लक्षात घेता प्रस्तावात नमुद केलेनुसार मानधन अदा करणेस तसेच प्रस्तावात नमुद केलेल्या पात्रते मधिल २ पदे वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करून उमेदवारांना मौखिक मुलाखती (**Walk In Interview**) पध्दतीने निवड करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ३२५६ विषय क्रमांक – २४
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – विद्युत मुख्य कार्या.
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक –मा.जगदीश शेटटी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/नि/५/कावि/२७२/२०१३ दि.४/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१५/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, ब प्रभागांतर्गत फेज २ ब्लॉक मुख्य रस्त्यावरील उर्जा बचत करण्याकरिता **LED** फिटींग बसविणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.८९,९०,३५६/- [र.रू. एकोणनव्वद लाख नव्वद हजार तीनशे छपन्न] पेक्षा ३३.०० **%** कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२५७ विषय क्रमांक – २५
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – विद्युत मुख्य कार्या.
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक–मा.विनया तापकीर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/नि/१/कावि/२७३/२०१३ दि.४/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१५/२०१२-१३ मधील अ.क्र.३ अन्वये, थेरगांव उपविभागातील नव्याने होणा-या रस्त्यावर दिवाबत्ती व्यवस्था करणेकामी मे.व्ही.पी.जी.इलेक्ट्रिकल्स प्रा.लि. (नि.र.रू.४९,६३,९०८/- [र.रू.एकोणपन्नास लाख त्रेसष्ट हजार नऊशे आठ] पेक्षा ३०.५६ **%** कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२५८ विषय क्रमांक – २६
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – प्रशासन
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशासन/०४/कावि/२८७/२०१३ दि.३/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

श्री.कावळे याची उच्च शिक्षणासाठी एकूण २४ महिने अद्ययन रजा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील प्रकरण ७ नुसार मंजूर करणेस व त्यांचेकडून महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील विहित नमुन्यात र.रू.१००/- चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र लिहून घेऊन प्रत्यक्ष उच्च शिक्षण

कालावधीची अध्ययन रजा मंजूर करणेस व श्री.कावळे यांना अध्ययन रजा कालावधीत महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियमातील तरतूदीनुसार वेतन अदा करणेस, उच्च शिक्षणाकरिता जाणे व येणेचा एक वेळचा रेल्वेचा प्रवास खर्च अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२५९ विषय क्रमांक – २७
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – मुख्य लेखापरिक्षक
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भः-मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/६००/२०१३ दि.४/४/२०१३.

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.११.२.१३ ते १७.२.१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/६००/२०१२ दि.४.४.१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२६० विषय क्रमांक – २८
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – मुख्य लेखापरिक्षक
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक –मा.शकुंतला धराडे
संदर्भः-मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/६०१/२०१३ दि.४/४/२०१३.

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१८.२.१३ ते २४.२.१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/६०१/२०१२ दि.४.४.१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२६१ विषय क्रमांक – २९
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – मुख्य लेखापरिक्षक
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक–मा.महेशदादा लांडगे
संदर्भः-मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/६०२/२०१३ दि.४/४/२०१३.

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२५.२.१३ ते ३.३.१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/६०२/२०१२ दि.४.४.१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२६२ विषय क्रमांक – ३०
दिनांक – ९/४/२०१३ विभाग मुख्य लेखापरिक्षक
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक –मा.अरुणा भालेकर
संदर्भ:-मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/६०३/२०१३ दि.४/४/२०१३.

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.४.३.१३ ते १०.३.१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/६०३/२०१२ दि.४.४.१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२६३ विषय क्रमांक – ३१
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.जगदीश शेटटी अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/१०३/२०१३ दि.४/४/२०१३.

मा शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अ.क्र.३७ अन्वये, वॉर्ड क्र.८१ मध्ये पिंपरी काळेवाडी पुलापासून ते साई इनक्लेव्ह पर्यंत १८ मी.डी.पी.रस्त्याचे बी.सी.पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.२३,३४,१९३/- [र.रू.तेवीस लाख चौतीस हजार एकशे त्र्यान्नव] पेक्षा १७.६० **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२०,१९,५४४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२६४ विषय क्रमांक – ३२
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक –मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/१०२/२०१३ दि.४/४/२०१३.

मा शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अ.क्र.२८ अन्वये, प्रभाग क्र.७६ मधील हॅपी थॉटस ते विमल गार्डन १२ मी.डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करणे व फुटपाथ करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.२२,४०,८९६/-

[र.रू.बावीस लाख चाळीस हजार आठशे शहान्नव] पेक्षा १७.६० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१९,३८,८२३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२६५ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ९/४/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भः-मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/१०१/२०१३ दि.४/४/२०१३.

मा शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अ.क्र.३३ अन्वये, प्रभाग क्र.९८ सुदर्शननगर काशीद पार्क व इतर भागातील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.२१,१०,१७७/- [र.रू.एकवीस लाख दहा हजार एकशे सत्याहत्तर] पेक्षा १७.६० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१८,२५,७२५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२६६ विषय क्रमांक – ३४
दिनांक – ९/४/२०१३ विभाग स्थापत्य
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भः-मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/१००/२०१३ दि.४/४/२०१३.

मा शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अ.क्र.४० अन्वये, प्रभाग क्र.९८ मधील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.२३,३४,२६७/- [र.रू.तेवीस लाख चौतीस हजार दोनशे सदुसष्ट] पेक्षा १७.६० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२०,१९,६०८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर,

सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२६७ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ९/४/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक –मा.जगदीश शेटटी

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/९९/२०१३ दि.४/४/२०१३.

मा शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अ.क्र.२० अन्वये, प्रभाग क्र.९८ सुदर्शननगर भागातील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.१३,०७,१९०/- [र.रू.तेरा लाख सात हजार एकशे नव्वद] पेक्षा १७.६० **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. ११,३०,९८१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३२६८ विषय क्रमांक – ३६

दिनांक – ९/४/२०१३ विभाग –

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक –मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव

मनपाचे आ.क्र.४१५ वॉर्ड क्र. ३४ आदिनाथनगर भोसरी उद्यान देखभाल व संरक्षणाचे काम मे. अजिंक्य मित्र मंडळास दरमहा र.रु. २०,६०३/- या अंशता सेवाशुल्क तत्वावर पुढील तीन वर्षे कालावधीकरिता त्यांचा पुर्वानुभव व मनपाचे आर्थिक हित विचारात घेता देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२६९ विषय क्रमांक – ३७
दिनांक – ९/४/२०१३ विभाग –
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक –मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव

मनपाचे खाली नमूद केलेली उद्याने मनपा दराने पुढील तीन वर्षे कालावधी करिता देखभाल संरक्षणाकामी मे.कमल एंटरप्रायजेस यांना देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

१) राजर्षी शाहू महाराज उद्यान, चिंचवड २) पार्वती उद्यान, चिंचवड, ३) सिल्व्हर गार्डन, चिंचवड, ४) संत ज्ञानेश्वर उद्यान, प्राधिकरण.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२७० विषय क्रमांक – ३८
दिनांक – ९/४/२०१३ विभाग –
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक –मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव

सेक्टर नं. २३ वाहतुकनगरी आरक्षीत वाहनतळ पार्किंगसाठी उपलब्ध असून सदर वाहनतळ ११ महिने या कालावधीकरिता र.रु. ४०,०००/- प्रति दरमहा सर्व करासहीत देणेस व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२७१ विषय क्रमांक – ३९
दिनांक – ९/४/२०१३ विभाग –
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक –मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र. १७ संत तुकाराम उद्यान या प्रभागातील दैनंदिन रस्ते झाडलोट करणे , गटर साफसफाई करणे इत्यादी तत्सम साफ सफाईचे कामकाज श्री.स्वामी समर्थ बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांना ३ वर्षे कालावधीकरिता थेट पध्दतीने देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२७२ विषय क्रमांक – ४०

दिनांक – ९/४/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/८०/२०१३ दि.६/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/२०१२-१३ मधील अ.क्र.१ मनपाच्या भोसरी नाशिक हायवेवर शितलबाग येथे फुटओव्हर ब्रीज बांधणेकामी मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन (नि.र.रू. ७१,०५,०८७/- र.रू.एकाहत्तर लाख पाच हजार सत्याऐंशी) पेक्षा ३१ % जास्त सुधारीत दर निविदा मंजूर दराने र.रु.९३०७६६४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटीप्रमाणे डांबर सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(नवनाथ दत्तू जगताप)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/ ३८३ /२०१३
दिनांक - १०/०४/२०१३.

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.